जनसंपर्क कक्ष
3 MAR 2018 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी, मुंबई विद्यापीठांची रायगड परिक्रमा उत्साहात



**रायगड : कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्यासोबत रायगड परिक्रमेत सहभागी शिवाजी विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठाचे विद्यार्थी.**

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड परिक्रमा शिवराजधानीची हा उपक्रम उत्साहात पार पडला. उपक्रमामध्ये शिवाजी विद्यापीठांतर्गत ४० मुले व मुली तसेच २० अधिकारी, कर्मचारी आणि मुंबई विद्यापीठांतर्गत ४० मुले व मुली तसेच २० अधिकारी, कर्मचारी अशा १२० जणांनी सहभाग नोंदवला.

या उपक्रमांच्या माध्यमातून सहभागी शिबिरार्थींना इतिहासाची प्रत्यक्ष माहितीसह शाहिरी पोवाडा कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रबोधन करण्यात आले. परिक्रमा यशस्वी करण्याच्या दृष्टीने विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, क्रीडा विभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सुनील पाटील, वित्त व लेखाधिकारी विजय तायडे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. बी. एस. बिंडवे यांनी सक्रिय सहभाग नोंदवून विशेष मार्गदर्शन केले. तसेच शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभागातील सुजित मुंढे, सुरेश मोरे यांनी परिश्रम घेतले.

3 MAR 2018

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी श्रेणी सुधार

## २२ अभ्यासक्रमांचा समावेश : दोन संधींत विद्यार्थ्यांना करावी लागणार श्रेणी सुधारणा

संदीप खांडेकर : सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २ : शिवाजी विद्यापीठाने यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी श्रेणी सुधारणा योजना लागू केली आहे. विशेष म्हणजे यापुढे विद्यार्थ्यांना श्रेणी सुधारणा करण्यासाठी दोन संधी उपलब्ध केल्या आहेत. योजनेचा लाभ घेणाऱ्या अभ्यासक्रमांचा आकडा २२ झाला असून विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने त्यासाठी काटेकोर नियम तयार केले आहेत. श्रेणी सुधारण्यासाठी यापूर्वी दिल्या जाणाऱ्या संधींमध्ये ताळतंत्र नसल्याने परीक्षा विभागाने नियमांत बदल केले आहेत.



परीक्षेत समाधानकारक गुण न मिळाल्यास विद्यार्थ्यांना श्रेणी सुधार करण्याची संधी दिली जाते. गुणांबाबत गंभीरपणे विचार करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून अर्ज केले जातात; मात्र ते करताना त्यांच्याकडून नकळतपणे चुका होतात. श्रेणी सुधारण्यासाठी काही विद्यार्थ्यांकडून अंतिम वर्षाची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर चार-पाच वर्षांनी अर्ज करण्याचे प्रकार केल्याचे परीक्षा विभागाच्या निदर्शनास आले. त्या शाखेचा अभ्यासक्रम बदलल्यानंतर अर्ज केल्याने परीक्षा विभागापुढे अर्ज स्वीकारायचा कसा असा प्रश्न निर्माण व्हायचा. जून, जुलै, ऑगस्टमध्ये विद्यार्थ्यांकडून अर्ज केले जायचे. विद्यार्थी शुल्क देतोय मग अर्ज स्वीकारला पाहिजे, या मानसिकतेत असायचा.

### अभ्यासक्रम असे...

एम.ए. (भाषा), एम.ए. (सामाजिकशास्त्रे), एम.जे.सी, एम. लिब, एम.एस.डब्ल्यू, एम.एड, एम.पी.एड, एल.एल.एम, एम. कॉम, एम.बी.ए, एम.एस्सी, बी.ई, बी.टेक्स्टाईल, बी. आर्किटेक्चर, बी.फार्मसी, एम.ई,एम. टेक्सटाईल, एम.फार्मसी, एम.आर्किटेक्चर, एम.सी.ए. (अभियांत्रिकी, विज्ञान व वाणिज्य).

यंदापासून व्यावसायिक अभ्यासक्रमांचा श्रेणी सुधारमध्ये समावेश केला आहे. श्रेणी सुधारणा प्रवेश घेण्यासाठी उत्तीर्ण झालेल्या परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर पुढील परीक्षेचा अर्ज भरण्यापर्यंतच्या मुदतीत विद्यार्थ्यांनी नोंदणी करणे आवश्यक आहे. अंतिम वर्षातील सेमिस्टरचे जास्तीत जास्त चार विषय घेऊन विद्यार्थ्यांना केवळ थेअरी परीक्षा देता येणार आहे. टर्मवर्क, स्वाध्याय परीक्षा, इतर अंतर्गत परीक्षेच गुण यापैकी कोणत्याही प्रकारच्या परीक्षेचे गुण श्रेणी सुधारणा पूर्वीचे असल्यास ते कायम राहतील. महत्त्वाचे म्हणजे श्रेणी सुधारणासाठीचा अर्ज विद्यार्थ्यांनी आपापल्या महाविद्यालयातर्फे किंवा अधिविभागातर्फे देणे सक्तीचे आहे.

श्रेणी सुधारणा अंतर्गत एकदा प्रवेश घेतल्यानंतर श्रेणी सुधारणा झाल्यास तो निकाल अंतिम राहणार असून, जर श्रेणी सुधारणा झाली नाहीतर सुधारणेपूर्वीचा निकाल कायम राहणार आहे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या अंतिम वर्षाच्या अभ्यासक्रमाची शेवटची प्रश्नपत्रिका उपलब्ध असेपर्यंत श्रेणी सुधारणाची परीक्षा उत्तीर्ण होणे गरजेचे आहे. त्यानंतर विद्यार्थ्यांना श्रेणी सुधारणेची कोणतीही संधी व समकक्ष सुविधा मिळणार नाही.

श्रेणी सुधारणाकरिता नोंदणी करून परीक्षेला गैरहजर राहणाऱ्या अथवा अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना पुन्हा नव्याने नाव नोंदणी व परीक्षा अर्ज भरावा लागणार आहे. याबाबत परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे म्हणाले, ''ही प्रक्रिया सुटसुटीत केली आहे. त्याचा विद्यार्थ्यांना निश्चित फायदा होईल.''

13 MAR 2018 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ऊर्जा-संवाद ध्येयवेड्यांशी आजपासून

## फिझिंगा - संजय घोडावत ग्रुप प्रस्तुत : शिवाजी विद्यापीठ लोककला केंद्रात कार्यक्रम

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २ : ज्ञानाची कक्षा रुंदावून नवविचारांची ऊर्जा चेतवणारा सकाळ माध्यम समूह आणि शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित फिझिंगा - संजय घोडावत ग्रुप प्रस्तुत 'ऊर्जा - संवाद ध्येयवेड्यांशी' या कार्यक्रमाची सुरुवात उद्यापासून (ता. ३) होत आहे. शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्रात या मुक्त संवाद मालिकेला प्रारंभ होईल. उद्या (ता. ३) पहिल्या दिवशी प्रसिद्ध अभिनेता श्रेयस तळपदे यांच्याशी संवाद साधला जाईल.

संवाद ध्येयवेड्यांशी ऊर्जा

**आज शनिवार (ता. ३)**



प्रसिद्ध अभिनेता, निर्माता व दिग्दर्शक श्रेयस तळपदे

'ऊर्जा' उपक्रमाचे यंदाचे चौथे वर्ष आहे. तीन वर्षांत विविध क्षेत्रांतील सेलिब्रिटीज्शी दिलखुलास संवाद साधण्याची संधी मिळाली. साहजिकच या तिन्ही उपक्रमांना कोल्हापूरकरांनी मोठी उपस्थिती लावली आणि नवविचारांची ऊर्जा बरोबर घेतली. 'ऊर्जा संवाद ध्येयवेड्यांशी' कार्यक्रमाची कोल्हापूरकर आतुरतेने वाट पाहत असतात, असाच हा सोहळा असतो. यंदाही विविध क्षेत्रात ठसा उमटवणाऱ्या अशाच नामांकित वक्त्यांची प्रभावळ

पान ८ वर »

# ऊर्जा-संवाद ध्येयवेड्यांशी आजपासून

» पान १ वरून

या उपक्रमाला लाभली आहे. उद्यापासून (ता. ३) सुरू होणाऱ्या कार्यक्रमासाठी आजच वेळेचे नियोजन करा. ६ मार्चपर्यंत संवाद साधला जाईल.

## शिवाजी विद्यापीठाचे विशेष सहकार्य

'ऊर्जा : संवाद ध्येयवेड्यांशी' या उपक्रमाला गेली चार वर्षे शिवाजी विद्यापीठाचे विशेष सहकार्य मिळाले आहे. विद्यापीठाच्या लोककला केंद्रात रोज सायंकाळी सहा ते रात्री आठ या वेळेत मुलाखती रंगतील. गर्दीच्या पार्श्वभूमीवर पार्किंगची नेटकी व्यवस्था असेल.

## प्रायोजकांविषयी

- सहप्रायोजक : चाटे शिक्षण समूह, मार्व्हलस् इंजिनिअर्स प्रायव्हेट लिमिटेड, तनिष्क ज्वेलर्स, अशोकराव माने ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स, श्री ट्रॅव्हल्स
- हॉस्पिटॅलिटी पार्टनर : हॉटेल सयाजी
- रेडिओ पार्टनर : रेडिओ सिटी

## असे होतील संवाद



**रविवार (ता. ४) :** भारतीय अंध क्रिकेट संघाचे माजी कर्णधार पद्मश्री शेखर नाईक, रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेत्या सामाजिक कार्यकर्त्या नीलिमा मिश्रा.

**सोमवार (ता. ५) :** सॉफ्टवेअर क्षेत्रातील प्रसिद्ध तंत्रज्ञ राकेश देशमुख, प्रसिद्ध जाहिरातकार राज कांबळे.





**मंगळवार (ता. ६) :** साताऱ्याचे पोलिस अधीक्षक संदीप पाटील, पायलट व विमान निर्मितीतील मराठी उद्योजक कॅप्टन अमोल यादव

## मोफत सन्मानिका

कार्यक्रमाला सर्वांसाठी विनामूल्य खुला प्रवेश असून मोफत सन्मानिका 'सकाळ'च्या शिवाजी उद्यमनगरातील कार्यालयात उपलब्ध आहेत. त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. सकाळी दहा ते सायंकाळी पाच या वेळेत सन्मानिकांचे वितरण सुरू आहे. रेडिओ सिटी (धैर्यप्रसाद हॉलजवळ, ताराबाई पार्क), श्री ट्रॅव्हल्स (शाहूपुरी, कोल्हापूर) येथेही सन्मानिका उपलब्ध आहेत.

13 MAR 2018

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ माध्यम समूह व शिवाजी विद्यापीठ
यांच्या संयुक्त विद्यमाने

सकाळ
उदय भविष्यपत्राचा

सोम

YOUNG
INSPIRATORS
NETWORK
Inspire. Network. Deliver

Fizzinga
SANJAY GHODAWAT GROUP

प्रस्तुत

# संवाद ध्येयवेड्यांशी ऊर्जा 2018

# आजपासून सुरु

**दि. ३ ते ६ मार्च २०१८**

वेळः सायं. ६ ते ८

स्थळ : लोककला केंद्र,
शिवाजी विद्यापीठ
(पदवीदान सभागृह), कोल्हापूर.

ज्यांचे जीवन,
विचार, कार्य
प्रेरक आहेत..
अशा यशस्वी
ध्येयवेड्यांना
भेटण्याची संधी!

# संवाद ध्येयवेड्यांशी





आज ३ मार्च

## श्रेयस तळपदे

चित्रपट अभिनेता

मालिका, मराठी व हिंदी चित्रपट सृष्टीतील यशस्वी अभिनेता. निर्माता-दिग्दर्शक म्हणून ही ओळख. त्याचबरोबर विविध कार्यक्रमांमध्ये अँकर व जज् म्हणूनही कार्यरत.

Co Sponsor

Chate — The Symbol Of Merit | MARVELOUS ENGINEERS PVT. LTD | TANISHQ | ASHOKRAO MANE GROUP OF INSTITUTIONS | श्री ट्रॅव्हल्स

Hospitality Partner: SAYAJI — Yours. Truly.

Radio Partner: RAG RAG MEIN KOLHAPUR CITY. — Radio City

प्रवेश विनामुल्य

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 MAR 2018
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेवर संजय जाधव यांची निवड

**कसबा बावडा (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य म्हणून संजय पांडुरंग जाधव (एस.पी.) यांची बिनविरोध निवड झाली. विद्यापीठ विकास आघाडीच्या माध्यमातून नोंदणीकृत पदवीधर गटातून ही निवड झाली. विद्यापीठाच्या पहिल्या सिनेट सदस्य बैठकीत या निवडीवर शिक्कामोर्तब करण्यात आले.



जाधव हे नुकत्याच झालेल्या निवडणुकीत नोंदणीकृत पदवीधर गटातून सर्वाधिक मतांनी निवडून आले होते. तसेच विकास आघाडीच्या समन्वयामध्ये आघाडीचे अध्यक्ष डॉ .संजय डी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली . जाधव सध्या डी. वाय. पाटील मेडिकल कॉलेज कसबा बावडा येथे उपकुलसचिव म्हणून कार्यरत आहेत .या निवडीसाठी डॉ. डी.वाय.पाटील संस्थेचे अध्यक्ष डॉ .संजय डी.पाटील, उपाध्यक्ष आमदार सतेज पाटील, विश्वस्त ऋतुराज पाटील तसेच विकास आघाडीच्या सदस्यांचे सहकार्य लाभले.